महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra

# शासकीय अध्यापक महाविद्यालय (सीटीई) पनवेल

# Government College of Education (CTE) Panvel

# आचारसंहिता आणि व्यावसायिक नीतिमत्ता हस्तपुस्तिका

# Code of Conduct and Professional Ethics Handbook

# शिक्षक- प्रशिक्षणार्थी आचारसंहिता आणि व्यावसायिक मूल्ये

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | आशय | पृ.क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रास्ताविक | |
| 2 | ध्येय व उद्‌दिष्टे | |
| 3 | शिक्षक- प्रशिक्षणार्थी आचारसंहिता | |
| 4 | शिक्षक आचारसंहिता | |
| 5 | भविष्यकालीन शालेय शिक्षक म्हणून शिक्षक-प्रशिक्षणार्थीसाठीची नैतिक व व्यावसायिक आचार संहिता | |
| ६ | सहाध्यायी शिक्षक व इतर कर्मचारी यांच्यासंदर्भात कर्तव्ये व जबाबदाऱ्या: | |
| ७ | मानवी मूल्ये आणि व्यावसायिक मूल्ये | |
| ८ | आचारसंहिता आणि मूल्ये रुजवणूकीसाठीचे नियम | |
| ९ | व्यावसायिक नीतिमत्ता कार्यक्रमांचे नियोजन | |
| १० | आचारसंहिता नियंत्रण समिती | |
| ११ | आदर्श शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये | |

उद्दिष्टे:

१) भागधारकांना आचारसंहितेचे आकलन व जाणीव जागृती होण्यास मदत करणे.
२) भागधारकांना कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे आकलन व जाणीव जागृती होण्यास मदत करणे.
३) भागधारकांना मानवी मूल्ये आणि व्यावसायिक मूल्यांचे आकलन व जाणीव जागृती होण्यास मदत करणे.
४) भागधारकांना आचारसंहितेचे पालन करण्यास मदत करणे.
५) भागधारकांच्या ठिकाणी मानवी व व्यवसायिक मूल्यांची रुजवणूक करण्यास मदत करणे.
६) भागधारकांसाठी व्यवसायिक आचारसंहिता व मूल्य रुजवणूकीसाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन करणे.
७) शिक्षक- प्रशिक्षकांना उत्कृष्ट शिक्षकाच्या दिशेने वाटचाल करण्यास मदत करणे.

## शिक्षक- प्रशिक्षणार्थी आचारसंहिता

आचार संहिता म्हणजे वर्तणुकीचीसंबंधीचे नियम होय. शिक्षक-प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण प्रभावी व गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी महाविद्यालयाने काही नियम घालून दिलेले आहेत.ते नियम म्हणजेच प्रशिक्षणार्थ्यांची आचारसंहिता होय. सर्व प्रशिक्षणार्थींनी या आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक असेल.

१) महाविद्यालयाने विहित केलेल्या नियोजन व वेळापत्रकानुसार प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयात नियमित उपस्थित रहाणे अनिवार्य असेल. (१०.३० ते ५.३०)
२) मुंबई विद्यापीठाच्या बी.एड. अभ्यासक्रमातील नियम व निर्णयात नमूद केल्यानुसार तात्विक भागाच्या अध्यापनाच्यावेळी किमान ८० % उपस्थिती अनिवार्य असेल. तर प्रात्यक्षिके आणि आंतरवासिता या काळात किमान ९० % उपस्थिती अनिवार्य असेल.
३) प्रशिक्षणार्थ्यांने आपल्या उपस्थिती संदर्भात सातत्याने दक्ष राहावे. आपली उपस्थिती अधिकाधिक वाढविण्याचा सतत प्रयत्न करावा. स्वयंशिस्त अंगी बाणविणे अनिवार्य असेल.
४) प्रशिक्षणार्थ्यांने अपरिहार्य कारणास्तव गैरहजर राहताना प्राचार्य/उपस्थिती विभाग प्रभारी प्राध्यापक यांची लेखी पूर्व परवानगी घेणे अनिवार्य असेल.
५) प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षण काळातील होणाऱी सर्व प्रात्यक्षिक कार्ये, आंतरवासिता, तात्विक भागांचे अध्यापन, अंतर्गत मूल्यांकन प्रक्रिया आणि विविध उपक्रमांमध्ये उपस्थित राहून सक्रीय होणे अनिवार्य राहील.

६) प्रशिक्षणार्थ्यांने मुंबई विद्यापीठाने दिलेल्या बी.एड. अभ्यासक्रमाचे आणि त्यातील सर्व नियमांचे आकलन करून घेऊन त्यांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

७) प्रशिक्षणार्थ्यांने कोणत्याही शैक्षणिक कार्यात सहभागी होताना महाविद्यालयीन गणवेश व शिक्षकी व्यवसायाला साजेसा समाजमान्य असा वेश परिधान करावा. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा आणि स्वयंशिस्तीच्या सवयी लावून घेण्यास जबाबदार असावे.

८) प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षण काळात नेमून दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांचे पालन करावे.

९) प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षण काळात नेमून दिलेली प्रात्यक्षिक कार्ये, आंतरवासिता, विविध उपक्रम, आणि अंतर्गत मूल्यांकन यामध्ये गुणवत्तापूर्ण कार्य करावे, आणि विहित वेळेत त्याचे सादरीकरण करावे.

१०) प्रशिक्षणार्थ्यांला प्रशिक्षण काळात प्रसंगानुसार विविध कुल,मंडळ व गटामध्ये विभागले जाते. ज्या गटात विभागले जाईल त्या गटातच राहून उत्साहाने व हिरिरीने भाग घेऊन आपले शैक्षणिक कार्य दर्जेदार करणे अनिवार्य असेल.

११) प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक, ग्रंथपाल, कार्यालयीन कर्मचारी आणि सर्व सहाध्यायी यांचा आदर करावा. नम्रतेने वागावे. शैक्षणिक वातावरण निकोप व सौहार्दपूर्ण राहील असे जबाबदारीने वागावे.

१२) प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या नियमांचे आकलन करून घेऊन पालन करणे अनिवार्य राहील.

१३) प्रशिक्षणार्थ्यांने आंतरवासिता, क्षेत्रभेटी, व इतर उपक्रमांसाठी विविध क्षेत्रांवर/ठिकाणी गेल्यास आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असेल.

१४) प्रशिक्षणार्थ्यांने आपापसात जातीय ऐक्य व सदिच्छा वाढीस लावाव्यात; आणि राजकारण, धर्म, जात,लिंग, वंश, भाषा, समुदाय.. इत्यादींवर आधारित कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता वागावे.

१५) प्रशिक्षणार्थ्यांने अँटी रॅगिंग संबंधीचे सर्व नियम आकलन करून घेऊन त्याचे काटेकोर पालन करणे अनिवार्य असेल.

१६) वसतिगृहातील प्रशिक्षणार्थ्यांने संबंधित वसतिगृहाच्या नियमांचे आकलन करून घेऊन पालन करणे अनिवार्य असेल.

१७) प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयात, विद्यापीठात किंवा इतर ठिकाणी आयोजित केलेल्या विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभागी होऊन प्राविण्य व यश संपादन करावे.

१८) प्रशिक्षणार्थ्यांने शैक्षणिक वर्षारंभी/शैक्षणिक सत्रारंभी आपले व्यक्तिगत शैक्षणिक नियोजन (अभ्यास, असाइन्मेंट, प्रात्यक्षिक कार्ये...इ.) करून सतत शैक्षणिक कार्याची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करावा.

१९) प्रशिक्षणार्थ्यांने आदर्श शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन सतत आदर्श शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये आपल्या अंगी बानविण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. सातत्याने ज्ञानार्जनात मग्न असावे. अध्यापन कौशल्ये, भाषिक कौशल्ये आणि तांत्रिक कौशल्यांवर प्रभुत्व मिळविण्याचा सातत्याने प्रयत्न करावा.

२०) प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयाचा परिसर हरीत, सुशोभित आणि स्वच्छ व सुंदर राहील यासाठी आपले योगदान देण्याचा प्रयत्न करावा. पर्यावरण विषयक मूल्ये अंगी बानवावीत.

२१) प्रशिक्षणार्थ्यांने राष्ट्रीय ध्वज व राष्ट्रगीताचा सन्मान करावा. व्यक्तिगत व्यावसायिक विकास करावा. प्रादेशिक, धार्मिक, भाषिक, सहिष्णुता ठेवावी. महिलांचा आदर करावा. जनसंपत्तीचे रक्षण करावे. हिंसेपासून दूर राहावे.

२२) प्रशिक्षणार्थ्यांने महाविद्यालयातील विज आणि पाणी यांचा अपव्यय टाळावा.

२३) प्रशिक्षणार्थ्यांने आंतरवासिता काळात शाळेमध्ये शिक्षक-प्रशिक्षणार्थी म्हणून कार्यरत असताना संबंधित शाळेच्या नियमांचे आणि महाविद्यालयाच्या आंतरवासिता विभागाने दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असेल.

२४) महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या मूल्यांकन प्रक्रियेत एक परीक्षक म्हणून स्वयंमूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन, किंवा शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यांकन करताना निष्पक्षपातीपणे, वस्तुनिष्ठपणे, मूल्यांकनाचे सर्व निकष विचारात घेऊन मूल्यांकन करण्याची सवय अंगी बानविणे अनिवार्य राहील.

२५) प्रशिक्षणार्थ्यांने उच्चतम मूल्यांची कास धरावी. अध्यापन व्यवसायावर निष्ठा ठेवावी.

## * शालेय शिक्षक म्हणून शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांसाठीची आचारसंहिता / शालेय शिक्षक आचारसंहिता

आज प्रशिक्षण महाविद्यालयात प्रशिक्षण घेणारा प्रशिक्षणार्थी हा भविष्यकालीन शिक्षक असतो; म्हणून त्यांनी शालेय शिक्षकांची आचार संहिता आकलन करून घेणे. शिक्षक-प्रशिक्षण काळात शिक्षक आचारसंहितेचे पालन करण्याच्या दृष्टीने आचरण करणे आणि शिक्षकाची आचारसंहिता अंगीकारण्याची सवय लावून घेणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासनाने शिक्षकांसाठी तयार केलेली आचारसंहिता पुढीलप्रमाणे:

१) राजकारण, वंश, धर्म, जात, भाषा, लिंग वा अन्य कोणत्याही स्वतःच्या लहरीनुसार वा वैयक्तिक कारणांवरून शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना भेदभाव न करता वागवतील व अन्य विद्यार्थी, नोकरदार वा शालेय व्यवस्थापनाविरुद्ध विद्यार्थ्यांना भडकावणार नाहीत.

२) शैक्षणिक विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग करीत असताना शालेय सोयींचा दुरुपयोग करणार नाहीत.

३) संस्था वा व्यवस्थापनाच्या मूलस्त्रोत वा सोयींचा, वैयक्तिक, व्यापारी, राजकीय वा धार्मिक हेतूसाठी उपयोग करणार नाहीत.

४) विद्यार्थ्यांचे मूल्यांकन निष्पक्षपातीपणाने करतील व जाणीवपूर्वक कोणाला जास्त वा कमी गुण देणार नाहीत. जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांचे नुकसान करणार नाहीत.

५) शिकवणी घेण्याच्या नियमांच्या पालना व्यतिरिक्त शिक्षक शिक्षणाचे खाजगी वर्ग (कोचिंग क्लासेस) चालविणार नाहीत वा त्यात काम करणार नाहीत. तसेच खाजगी शिकवण्याही घेणार नाहीत.

६) सुट्टीत वा रजेवर जाताना स्वतःचा पत्ता आपल्या कार्यालय प्रमुखांकडे देतील.

७) पूर्ण वेळ काम करणाऱ्या शिक्षकांना अन्य शैक्षणिक, सांस्कृतिक वा वांङ्मयीन संस्थात पगारी, आंशिक नोकरी पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. (परवानगी दिली गेली असल्यास) असे आंशिक काम दररोज दोन तासांपेक्षा जास्त असता उपयोगी नाही. मात्र रात्रशाळेत शाळेच्या पूर्णवेळ काम करता येईल.

८) विद्यार्थी, विद्यार्थिनी व अन्य नोकरदारांशी सभ्यपणाने वागतील.

९) मादक द्रव्य व पेये यांच्या सेवनाबाबत शिक्षक ज्या क्षेत्रात राहतो त्या क्षेत्रास लागू असणाऱ्या कायद्याचे शिक्षक कसोशीने पालन करतील. यामध्ये पुढील नियमांचा समावेश होतो.

अ) कामावर असताना असे मादक पदार्थ सेवन करू नयेत वा शिक्षकाने त्यांच्या प्रभावाखाली असता उपयोगी नाही. तसेच अशा पदार्थांच्या सेवनामुळे त्यांच्या

कर्तव्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

आ) सार्वजनिक ठिकाणी अशा पदार्थांचे सेवन करता येणार नाही.

इ) झिंगलेल्या स्थितीत सार्वजनिक ठिकाणी येऊ नये.

ई) वर्तनावर नियंत्रण ठेवता येणे अशक्य होई पर्यंत असे मादक द्रव्य व पेय अधिक प्रमाणात घेता येणार नाही.

वरील नियमांचे/ आचारसंहितेचे पालन न केल्यास ती कर्तव्याकडे दुर्लक्ष करणे व चुकीचे वर्तन व दोन्हीही समजले जाईल.

## भविष्यकालीन शालेय शिक्षक म्हणून शिक्षक-प्रशिक्षणार्थींसाठीची नैतिक व व्यावसायिक आचार संहिता

नैतिक व व्यावसायिक दृष्टीने भविष्यकालीन शिक्षक म्हणून शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांनी पुढील आचारसंहितेचे पालन करावे.

**अ) खाजगी जीवन:**

१) भारतीय संविधानात सांगितलेल्या मूल्यांवर श्रद्धा असावी.

२) खाजगी जीवनात कायद्याचे पालन करावे.

३) खाजगी जीवन नैतिक नियमानुसार असावे.

४) उच्च मूल्यांवर विश्वास असावा.

५) चारित्र्यसंपन्नता असावी.

६) शाळेच्या प्रभावाचा खाजगी जीवनात फायदा घेऊ नये.

**आ) विद्यार्थ्यांशी व्यवहार:**

१) विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करावे. त्यांच्या बाबतीत संवेदनशील असावे.

२) सर्व विद्यार्थ्यांशी समानतेने वागावे.

३) विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक व हितचिंतक या नात्याने वागावे.

४) विद्यार्थ्यांना स्वयंसिद्ध होण्यास मदत करावी.

**इ) सामाजिक जीवन:**

१) सामाजिक कार्य उदाहरणार्थ साक्षरता प्रसार, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण इत्यादी कार्यक्रमात भाग घ्यावा.

२) आदर्श नागरिकास योग्य असे वर्तन करावे.
३) राष्ट्रीय जबाबदाऱ्या पाळाव्या.
४) सामाजिक जीवनात भाग घ्यावा.
५) शिक्षकांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवावे.

**ई) व्यावसायिक जीवन:**

१) स्वतःच्या व्यवसायाशी एकनिष्ठ असावे.
२) स्वतःच्या विषयाचा सातत्याने अभ्यास करावा.
३) शिक्षकास आवश्यक कौशल्यांचा सातत्याने विकास करावा.
४) सर्व कामे वक्तशीरपणे करावी.
५) उद्बोधन वर्ग, कार्यशाळा ,सेवांतर्गत प्रशिक्षण यांमध्ये सहभागी व्हावे.
६) सतत गतिमान असावे.
७) सरकारी व संस्थेच्या नियमांचे पालन करावे.

**उ) अन्य सहकारी:**

१) अन्य सहकाऱ्यांशी सुसंस्कृत रीतीने वागावे.
२) सर्वांशी सहकार्य करावे.
३) शैक्षणिक विषयांवर चर्चा करावी.

- **सहाध्यायी शिक्षक व इतर कर्मचारी यांच्यासंदर्भात कर्तव्य व जबाबदाऱ्या:**

१) शिक्षकाने इतर शिक्षक व कर्मचारी यांच्याशी आदराने वागावे.
२) शिक्षकाने प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे कोणत्याही सहकाऱ्यांची निंदा नालस्ती करू नये.
३) शिक्षकांनी इतर शिक्षक व अन्य कर्मचारी यांचा मनाने स्वीकार करावा.
४) शिक्षकाने गटबाजी करू नये.
५) शिक्षकाने इतरांच्या बाबतीत गुणग्राहकता दाखवावी.
६) शिक्षकाने ज्येष्ठ शिक्षकांकडून शिकावे व कनिष्ठ शिक्षकांना मार्गदर्शन करावे.

- **वर्ग व्यवस्थापन विषयक जबाबदाऱ्या व कर्तव्ये:**

७) शिक्षकाने आपले व्यक्तिमत्व सुधारण्याचा प्रयत्न व ते जास्तीत जास्त प्रभावी करण्याचा प्रयत्न करावा.

८) शिक्षकांनी मुलांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करावा व विद्यार्थ्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

९) शिक्षकाने आपल्या विषयात तज्ज्ञ असावे.

१०) शिक्षकाने अध्यापन करीत असताना विविध अध्यापन पद्धतींचा वापर करावा. कंटाळवाणी होईल असे शिकवू नये.

११) शिक्षकांचे संप्रेषण प्रभावी असावे.

१२) अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाने विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. शक्यतो अंतर क्रियात्मक अध्यापन पद्धती वापराव्या.

१३) शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह, पद्धती, तंत्रे, क्लुप्त्या, उपागम, साधने..इ. चा सातत्याने वापर करावा.

१४) शिक्षकाचे विद्यार्थ्यावर प्रेम असावे. व त्याने विद्यार्थ्यांची काळजी घ्यावी. शिक्षकांच्या खऱ्या भावनेचे विद्यार्थ्यांना प्रत्यंतर यावे.

१५) शिक्षकाने स्वतः शिस्तशीर वागावे. वर्गावर वेळेवर जावे. अध्यापन व इतर कार्यात कधीही कुचराई करू नये.

१०) आपल्या सर्व जबाबदाऱ्या व कर्तव्ये आकलन करून घेऊन योग्य प्रकारे पार पाडावीत.

_______________*******_________________

- **मूल्याधिष्ठित शिक्षक-प्रशिक्षणार्थी** ⁕

**( मानवी मूल्ये आणि व्यावसायिक मूल्ये)**

शिक्षक-प्रशिक्षणार्थींची भविष्यकालीन आदर्श गुणवत्तापूर्ण शिक्षक म्हणून जडणघडण होण्याच्या प्रक्रियेत शिक्षक -प्रशिक्षकाने प्रशिक्षण काळातील बी.एड. अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके, आंतरवासिता, अभ्यासपूरक , क्षेत्रीय भेटी इ.कार्यक्रम यांद्वारे स्वतःच्या ठिकाणी

जाणीवपूर्वक पुढील मानवी, व्यावसायिक, व्यक्तिगत, सामाजिक, राष्ट्रीय ,सौंदर्यात्मक आणि वैश्विक अशा वैविध्यपूर्ण मूल्यांची जोपासना करावी. विकास करावा.आणि मूल्यांची कास धरावी अशी मूल्ये पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | मूल्यांचे प्रकार/Types of Values | मूल्ये/Values |
|---|---|---|
| १) | मानवी मूल्ये/Human Values | Right conduct (योग्य आचरण) |
| | | Communal Harmony (जातीय सलोखा) |
| | | Peace (शांतता) |
| | | Truth (सत्य) |
| | | Love (प्रेम ) |
| | | Nonviolence(अहिंसा) |
| | | Discipline (शिस्त) |
| | | Integrity (अखंडता) |
| | | Honesty (प्रामाणिकपणा) |
| | | Respect for all (सर्वांचा आदर) |
| | | |
| २ | शालेय अभ्यासक्रमातील दहा मूल्ये | १)संवेदनशीलता(Sensitivity) |
| | | २) स्त्री पुरुष समानता(Gender equality) |
| | | ३)वैज्ञानिक दृष्टीकोन(Scientific approach |
| | | ४) नीटनेटकेपणा(Neatness) |
| | | ५) श्रमप्रतिष्ठा(Labour reputation) |
| | | ६) सौजन्यशीलता(Courtesy) |
| | | ७) राष्ट्रीय एकात्मता(National integration) |
| | | ८) सर्वधर्मसहिष्णुता(Interfaith harmony) |

| | | |
|---|---|---|
| | | ९) राष्ट्रभक्ती(Patriotism) |
| | | १०) वक्तशीरपणा(Punctuality) |
| ३) | दहा गाभाभूत घटक (१९८६ रा.शै.धो.) | १) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (History of Indian freedom movement) |
| | | २) भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या (Constitutional Obligations) |
| | | ३) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय (Content essential to nurture national identify) |
| | | ४) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा. (India's common cultural heritage.) |
| | | ५) समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता. (Egalitanaism, Democracy, and Secularism.) |
| | | ६) स्त्री- पुरुष समानता.(Equality of sexes ) |
| | | ७) पर्यावरण संरक्षण. (Protection of environment .) |
| | | ८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन.(Removal of Social Barriers |
| | | ९) छोट्या कुटुंबाचा आदर्श (Ideal of small female) |
| | | १०)वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक (Incucation of scientific temper.) |

## आचारसंहिता आणि मूल्ये रुजवणूकीसाठीचे नियम

१) नेहमी उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करा.(Always strive for Excellence)

२) विश्वासार्ह व्हा.(Be Trustworthy)

३) जबाबदारी घ्या.(Be Accountable)

४) विनम्र आणि आदरणीय व्हा. (BP Courteous and Respectful)

५) प्रामाणिक, स्वच्छ, मनमोकळे, निर्मळ आणि पारदर्शक व्हा. (Be Honest, Open minded, and Transparent.)

६) सक्षम व सुधारणात्मक व्हा.(Be Competent and improve Continually)

७) नेहमी नैतिक रहा. (Always be ethical)

८) नेहमी सन्माननीय रहा व सचोटीने वागा.(Always be honorable and act with integrity)

९) आत्मविश्वासाचा आदर करा. ((Be respect full of confidently)

१०) चांगले आदर्श ठेवा./ चांगली उदाहरणे तयार करा.(Set good examples/Be Role model)

**Professional Values/व्यावसायिक मूल्ये**

१) अखंडता/Integrity

२) विश्वासार्हता व जबाबदारी/Credibility and Responsibility

३) निष्ठा/Loyalty

४) बांधिलकी/Commitment

५) सकारात्मक वृत्ती/Positive Attitude

६) वेळेचे महत्व/वक्तशीरपणा/Valuing time

७) आवड/Passion

---

## व्यावसायिक नीतिमत्ता कार्यक्रमांचे नियोजन

आमच्या महाविद्यालयात शिक्षक-प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक (शिक्षक- प्रशिक्षक), कार्यालयीन कर्मचारी, आणि प्रशासक यांच्यासाठी वर्षभर सातत्याने व्यावसायिक नीतिमत्तेची अंमलबजावणी केली जाते. व्यवसायिक नीतिमत्तेचे संस्कार होण्यासाठी महाविद्यालयात विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात ते पुढील प्रमाणे:

## व्यावसायिक नीतिमत्ता कार्यक्रम व जनजागृती कार्यक्रम नियोजन तक्ता (Professional ethics programmes and code of conduct awareness programmes

| अ.क्र. | कार्यक्रम व उपक्रमाचे नाव | आयोजक/प्रभारी |
|---|---|---|
| १ | दैनिक हजेरी पत्रक | हजेरी विभाग |
| २ | दैनिक प्रार्थना व परिपाठ | तीन कुले |
| ३ | महनीय व्यक्तींच्या जयंत्या व पुण्यतिथ्या / राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्मृतिदिन कार्यक्रम | तीन कुले |
| ४ | तज्ज्ञांची प्रबोधनपर व्याख्याने | तीन कुले व तीन मंडळे |
| ५ | विविध दिन साजरे करणे (मराठी दिन, हिंदी दिन, विज्ञान दिन, गणित दिन, भूगोल दिन, भाषा दिन, आदिवासी दिन, वाचन प्रेरणा दिन, शिक्षक दिन, शिक्षण दिन, मातृभाषा दिन....इ.) | संबंधित अध्यापन शास्त्र विषय विभाग |
| ६ | राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आणि उत्सव.(स्वातंत्र्यदिन, संविधान दिन,प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, ) | छात्र परिषद |
| ७ | विविध सांस्कृतिक कार्यक्रम | तीन कुले |
| ८ | सेमिनार/वेबिनार | संबंधित विभाग |
| ९ | विविध स्पर्धात्मक कार्यक्रम (वक्तृत्व, निबंध लेखन, प्रश्नमंजुषा, हस्ताक्षर, वाचन, गायन,...इ) | तीन कुले व तीन मंडळे |
| १० | वार्षिक स्नेहसंमेलन | छात्र परिषद |
| ११ | विविध क्रीडा स्पर्धा | क्रीडा विभाग |
| १२ | मुंबई विद्यापीठ अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी | नियोजन विभाग |
| १३ | सत्र नियोजन व वेळापत्रक | नियोजन विभाग |
| १४ | विविध कृती सत्रे, उद्‌बोधन वर्ग, कार्यशाळा, चर्चासत्रे..इ. | संबंधित विभाग |
| १५ | आंतरवासिता उपक्रम | आंतरवासिता विभाग |
| १६ | विविध समित्यांचे गठन व त्यांची अंमलबजावणी (उदा. आचारसंहिता नियंत्रण समिती/शिस्त समिती, छात्र परिषद, अँटी रॅगिंग समिती,महाविद्यालय विकास समिती,महिला विकास समिती, ग्रंथालय समिती,माजी विद्यार्थी संघ,...इ) | संबंधित समिती |
| १७ | आचारसंहिता जाणीव जागृती उद्‌बोधन कार्यक्रम | आचारसंहिता समिती |

# आचारसंहिता नियंत्रण समिती (बी.एड.विभाग २०२०-२०२२)

## Code of conduct committee

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | प्रा.डॉ.सुविद्या महेश सरवणकर<br>(प्राचार्य/प्राध्यापक/Principal/Professor) |
| २ | प्रभारी प्राध्यापक | प्रा.डॉ.भरमू गुंडू खाडे<br>(प्राध्यापक/Professor) |
| 3 | प्राध्यापक प्रतिनिधी | श्रीमती. बिजली श्रीपाल दडपे<br>(सहयोगी प्राध्यापक/Associate professor) |
| 4 | महिला प्रतिनिधी | प्रा.डॉ.सुनिता आत्माराम लोंढे<br>(प्राध्यापक/Professor) |
| 5 | मागासवर्गीय प्रतिनिधी | प्रा.डॉ.निलिमा अ. मोरे<br>(प्राध्यापक/Professor) |
| 6 | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी | श्री.रवी मधुकर जाधव<br>(वरिष्ठ लिपिक/Senior Clerk) |
| 7 | प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी | श्री. हिमांशू शेखर पुंडे |
| 8 | महिला प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी | श्रीमती सविता जगन शिंगडा |
| 9 | चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रतिनिधी | श्रीमती सुचिता कदम |